# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः12.10.2025** **वारः रविवार**

---

● प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजना आणि डाळींमध्ये आत्मनिर्भरता मोहीम योजना देशातील लाखो शेतकऱ्यांचं भविष्य बदलतील पंतप्रधानांचं प्रतिपादन

· पीएम धनधान्य कृषी योजनेत राज्यातल्या ९ जिल्ह्यांचा समावेश

आणि

· दिल्ली क्रिकेट कसोटीमध्ये भारताचा पहिला डाव ५१८ धावसंख्येवर घोषित; वेस्ट इंडिजची अडखळत सुरुवात आणि

· महिला विश्व करंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात लढत

**<u>धनधान्य</u>**

प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजना आणि डाळींमध्ये आत्मनिर्भरता मोहीम देशातील लाखो शेतकऱ्यांचं भविष्य बदलतील असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल व्यक्त केला. पीएम धनधान्य कृषी योजना आणि डाळ उत्पादनात आत्मनिर्भरता मोहिमेसह ४२ हजार कोटी रुपये खर्चाच्या कृषी योजनांचा प्रारंभ काल पंतप्रधानांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. देशात विविध ठिकाणी झालेल्या या कार्यक्रमांत शेतकरी दूरस्थ पद्धतीनं सहभागी झाले होते.

या योजना आत्मनिर्भरता, ग्रामविकास आणि कृषी नवोपक्रमाच्या नवीन युगाची सुरुवात आहेत; असं पंतप्रधान म्हणाले. देशातल्या ३५ लाख हेक्टर क्षेत्रावर डाळीचं उत्पादन करणं हे या मोहिमेचं उद्दिष्ट आहे. यात तूर, उडीद, मसुर डाळीचं उत्पादन वाढवलं जाईल, याचा फायदा दोन कोटी डाळ उत्पादकांना होईल, असं त्यांनी सांगितलं.

धनधान्य योजनेत पशुधनावरही लक्ष केंद्रित केल्यांचं सांगताना पंतप्रधान म्हणाले...

गेल्या अकरा वर्षात कृषी क्षेत्रात केलेल्या सुधारणांचा मोदी यांनी आढावा घेतला. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनीही यावेळी उपस्थितांना संबोधित केलं. रब्बी पिकांच्या हमीभावात सरकारने वाढ केली, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजने अंतर्गत ३ लाख ९० हजार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरित झाला, असं चौहान यांनी सांगितलं.

**राज्यकार्यक्रम**

या योजनेचा राज्यातला मुख्य कार्यक्रम पुण्यात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळी अनेक शेतकरी दूरस्थ माध्यमातून उपस्थित होते. केंद्र आणि राज्य शासन शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेतकरी सक्षम व्हावा यादृष्टीनं काम करत आहे. शासनाच्या योजनांचा लाभ घ्या, नवीन तंत्रज्ञान आत्मसात करा आणि आपल्या शेतीला नवसंजीवनी द्या असं आवाहन करतानाच शेतीसाठी सर्वांनी मिळून एकत्र काम केल्यास महाराष्ट्र राज्य शेतीमध्ये अग्रेसर राहील, असा विश्वासही कृषिमंत्र्यांनी व्यक्त केला. प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजनेबाबत बोलताना ते म्हणाले.

**कृषीकार्यक्रम**

प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेत राज्यातल्या पालघर ,रायगड, धुळे, छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या नऊ जिल्ह्यांचा समावेश आहे. या जिल्ह्यांमधील शेतकरी या कार्यक्रमात दूरस्थ माध्यमातून सहभागी झाले होते.

Intro :

कालच्या  दिल्लीतील कार्यक्रमात सहभागी झाले नांदेड इथले प्राध्यापक संदीप जायभाये यांनी आकाशवाणीकडे आपली प्रतिक्रिया व्यक्त केली:

**<u>फडणवीस</u>**

कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये प्रत्येक भारतीयाच्या कल्पना आणि आकांक्षा घडवण्याची क्षमता आहे असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं.  मुंबईतील एका कार्यक्रमात ते काल बोलत होते. राज्य सरकारने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी धोरणे आधीच आणली आहेत. विविध पार्श्वभूमीच्या लोकांना  त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना यामुळे प्रत्यक्षात आणता येतील असं ते म्हणाले. कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन आणि डिजिटायझेशन यासारख्या तंत्रज्ञानामुळे उद्योगांमध्ये केवळ क्रांती होत नाही तर पारदर्शकताही येते आणि आणि प्रशासन कार्यक्षम होण्यास मदत होते.

**<u>अजितपवार</u>**

राज्यातील कला परंपरेचा समृद्ध वारसा जतन करण्यासाठी शासन कटीबद्ध आहे, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल सातारा जिल्ह्यातील औंध इथं सांगितलं. औंध वस्तू संग्रहालयाचं जतन संवर्धन करण्यासाठी शासनाने ५२ कोटी रुपयांचा आराखडा मंजूर केला असून पर्यावरणाचा समतोल राखून, ऐतिहासिक वारसा जपत संग्रहालयाचे नूतनीकरण करण्यात येईल, अशी ग्वाही पवार यांनी दिली. औंध इथल्या शिवानंद स्वामी संगीत प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित ८५ व्या औंध संगीत महोत्सवात ते बोलत होते.

**<u>बावनकुळे</u>**

जमीन मोजणीचा निपटारा आता ३० दिवसांत होणार आहे. महसूल विभागानं यासाठी परवानाधारक खाजगी भूमापकांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला असून, राज्य सरकारनं यासंदर्भातील अधिसूचना

जारी केल्याचं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं आहे. या निर्णयामुळे राज्यात प्रलंबित असलेली सुमारे तीन कोटी १२ लाख मोजणी प्रकरणं वेगाने मार्गी लागतील असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला.

**<u>तुकडोजीमहाराज</u>**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५७व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त राज्यातून मोठ्या संख्येनं आलेल्या भाविकांनी अमरावती इथल्या श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रमात तुकडोजी महाराजांना काल मौन आदरांजली अर्पण केली. नागपुरात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाने तुकडोजी महाराजांच्या गीत गायनाच्या विश्वविक्रमाची नोंद केली. एकाच वेळी १६ हजार पेक्षा अधिक जणांनी प्रत्यक्ष तर १५ हजारांपेक्षा अधिक जणांनी डिजिटल प्लॅटफॉर्मवर सहभाग नोंदवत, महाराजांच्या 'या भारतात बंधुभाव नित्य वसु दे...' या गीताचं गायन केलं. या गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसह चार विश्वविक्रमाची ऐतिहासिक नोंद विद्यापीठानं केली.

**<u>ठाकरे</u>**

शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी मिळावी या मागणीसाठी माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात काल छत्रपती संभाजीनगर इथे हंबरडा मोर्चा काढण्यात आला. यावेळी उद्धव ठाकरेंनी राज्य सरकारवर टीका करत, सरकारनं जाहीर केलेलं पॅकेज अमान्य असल्याचं सांगितलं. यावेळी त्यांनी दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना भरीव मदत देण्याची मागणी करत संपूर्ण कर्ज माफीच्या मागणीचा पुनरुच्चार केला.

**<u>न्यायालयउद्घाटन</u>**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या मंडणगडमधल्या दिवाणी आणि फौजदारी न्यायालयाच्या नव्या इमारतीचं उद्घाटन आज सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे

म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार असून, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडणार आहे.

**<u>दिव्यांग</u>**

सांगली जिल्ह्यातील दिव्यांग शाळांमधील विद्यार्थी तसंच  बालसुधारगृहातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या सजावटीच्या वस्तूंचं प्रदर्शन कालपासून जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात सुरू झालं. या प्रदर्शनाचं उद्घाटन खासदार विशाल पाटील आणि जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या हस्ते काल करण्यात आलं. या उपक्रमातून मुलांना स्वयंरोजगारातून एक सुजाण आणि स्वावलंबी नागरिक बनण्याचं प्रशिक्षण मिळणार आहे, असं प्रतिपादन जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी केलं. या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तुंच्या विक्रीतून काल दिवसभरात जवळपास 1 लाख 2 हजार 757 रूपये जमा झाले.

**<u>क्रिकेटमालिका</u>**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात दिल्लीमध्ये सुरू असलेल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारत भक्कम स्थितीत असून भारतानं 378 धावांची आघाडी घेतली आहे. यशस्वी जयसवाल आणि कर्णधार शुभमन गिल यांच्या शतकांच्या जोरावर भारतानं  5 बाद 518 धावांवर आपला पहिला डाव घोषित केला.

जयसवालनं 175 धावा केल्या तर शुभमन गिलनं नाबाद  129 धावा केल्या.  या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाहुण्या संघाची सुरुवात मात्र अडखळत झाली. कालचा खेळ संपला तेव्हा वेस्टइंडीजच्या  4 बाद 140 धावा झाल्या होत्या.

**<u>आयसीसीमहिला</u>**

आयसीसी महिला विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात लढत होणार आहे. विशाखापट्टणम इथं दुपारी 3 वाजता हा सामना सुरु होईल.

**<u>हवामान</u>**

येत्या २४ तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं,

## नमस्कार.